CMYK

जल जीवन मिशन अंतर्गत 'जल सेवा आंकलन' प्रभावीपणे राबवूया - गुलाबराव खरात मुकाअ जि. प. बुलढाणा >>पान 2

समाजकल्याण विभागांतर्गत जिल्हास्तरीय बैठका नियमित घेण्याचे विभागीय आयुक्तांचे निर्देश >>पान 3

डोणगावात भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव; गाईवर हल्ला करुन ठार, नागरिकामध्ये भीतीचे वातावरण >>पान 4

**सुविचार**

विचारांचा दिवा विझला की आचारांचा अंधार होतो. - अज्ञात


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 165 ■ शुक्रवार, दि. 23 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




आज हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती.

आतील पान

## महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी

# महापौर आरक्षण सोडत जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांमध्ये नुकत्याच निवडणुका पार पडल्या आहेत. या निवडणुकांमध्ये भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी काही महानगरपालिकांमध्ये भाजपाला सहाकारी पक्ष किंवा प्रसंगी विरोधी पक्षातील काही गटांचा पाठिंबा घेण्याची तजवीज करावी लागली. तर दुसरीकडे राज्यात सत्तेत एकत्र असणाऱ्या पक्षांना स्थानिक पातळीवर आपल्याच मित्रपक्षाविरोधात उभं राहण्याचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार स्थानिक नेत्यांवर देण्याचीवेळओढवली.यापार्श्र्वभूमीवर एकीकडे सत्तास्थापनेबाबत जवळपास सर्वच महानगरपालिकांमध्ये राजकीय नाट्य रंगत असताना दुसरीकडे महापौरपदाची सोडत हादेखील चर्चेचा विषय ठरला होता. ही सोडत अखेर जाहीर झाली आहे.




**कोणत्या महानगरपालिकेतील महापौरपद कोणत्या गटासाठी आरक्षित?**

२९ महानगरपालिकांमधील आरक्षणाचं गणित

अनुसूचित जमाती - १

अनुसूचित जाती - ३

ओबीसी - ८

सर्वसाधारण प्रवर्ग - १७

**कोणत्या महानगरपालिकेतील महापौरपद कोणत्या गटासाठी आरक्षित?**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिक - अनुसूचित जमाती

ठाणे महानगरपालिका - अनुसूचित जाती

जालना महानगरपालिका - अनुसूचित जाती (महिला)

लातूर महानगरपालिका - अनुसूचित जाती (महिला)

इचलकरंजी महानगरपालिका - ओबीसी

पनवेल महानगरपालिका - ओबीसी

अहिल्यानगर महानगरपालिका - ओबीसी (महिला)

अकोला महानगरपालिका - ओबीसी (महिला)

उल्हासनगर महानगरपालिका - ओबीसी

कोल्हापूर महानगरपालिका - ओबीसी

चंद्रपूर महानगरपालिका - ओबीसी (महिला)

जळगाव महानगरपालिका - ओबीसी (महिला)

मुंबई महानगरपालिका - खुला प्रवर्ग (महिला)

पुणे महानगरपालिका - खुला प्रवर्ग (महिला)

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका - खुला प्रवर्ग

धुळे महानगरपालिका - खुला प्रवर्ग (महिला)

अमरावती महानगरपालिका - खुला प्रवर्ग

भिवंडी-निजामपूर महानगरपालिका - खुला प्रवर्ग

मालेगाव महानगरपालिका - खुला प्रवर्ग (महिला)

मीरा-भाईंदर महानगरपालिका - खुला प्रवर्ग (महिला) >>पान ३

## अकोल्यात हाय व्होल्टेज पॉलिटिक्स; भाजपला रोखण्यासाठी सर्वपक्षीयांची आता आंबेडकरांना गळ, महापौर निवडणुकीत ट्विस्ट येणार

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी** : सर्वात मोठा पक्ष असला तरी अकोल्यात भाजपला रोखण्यासाठी आता 'हाय व्होल्टेज पॉलिटिक्स' रंगत असल्याचं दिसतंय. अकोल्यात भाजपला रोखण्यासाठी एमआयएम, काँग्रेस आणि अजित पवारांच्या आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनी प्रकाश आंबेडकरांची भेट घेतली. अकोल्यामध्ये भाजपला सर्वाधिक म्हणजे ३८ जागा मिळाल्या असून बहुमतासाठी ४१ नगरसेवकांची गरज आहे.

आमदार साजिद खान आणि वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यात बंद दाराआड ही बैठक झाली. या बैठकीत एमआयएम आणि दोन्ही राष्ट्रवादीचे नेते उपस्थित होते. काँग्रेसने ठाकरे गटाला मोठा प्रस्ताव दिला होता. एकंदरीत २१ नगरसेवक असलेली काँग्रेस म्हणते आम्हाला कुठलंच पद नकोय, भाजप विरोधात सर्वांनी एकत्र येत यावं, अन् अकोला महापालिकेत सत्ता स्थापन करावी.

काँग्रेस-वंचितमध्ये ४५ मिनिटांची बोलणी

तशाच विनंतीसाठी पाच नगरसेवक असलेल्या वंचित बहुजन आघाडीचा पाठिंबा मागण्यासाठी काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण हे अकोल्यातल्या आंबेडकरांच्या निवासस्थानी दाखल झाले. आमदार साजिद खान यांनी प्रकाश आंबेडकरांशी तब्बलं ४५ मिनिट बंद दाराआड बोलणी केली.

अकोल्यात बहुमताच्या ४१ आकड्याची जुळवणी करण्यासाठी भाजपने ठाकरेंच्या शिवसेनेला 'ऑफर' दिली होती. त्यानंतर काँग्रेसनेही ठाकरे गटाला मोठा प्रस्ताव दिला आणि आता आंबेडकरांना पाठिंबा देण्याची विनंती केली.

दरम्यान, ८० सदस्यांच्या अकोला महापालिकेत कोणत्याही पक्षाला बहुमत नाही. ३८ जागा जिंकत भाजप सर्वात मोठा पक्ष आहे. दुसरीकडे काँग्रेसचे २१, तर ठाकरेंच्या शिवसेनेचे ६ नगरसेवक आहेत. सत्ता स्थापनेत महत्त्वाची आणि 'किंगमेकर'ची वंचित आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनेची भूमिका आहे.

अकोला महापालिकेतील पक्षीय बलाबल

एकूण जागा : ८०

बहुमताचा आकडा : ४१

भाजप : ३८

काँग्रेस : २१

उबाठा : ०६

शिंदे सेना : ०१

अजित राष्ट्रवादी : ०१

शरद राष्ट्रवादी : ०३

वंचित : ०५

एमआयएम : ०३

अपक्ष : ०२

बैठकीत उपस्थित असलेले नेते

शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते आणि नगरसेवक रफिक सिद्धिकी, एमएमआयचे पदाधिकारी सैय्यद मोसीम, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा असलेल्या एकमेक विजयी झालेले नगसेवक पती फयाज खान उपस्थित होते.

## प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यातून मिळतोय जलद न्याय..!

**मुंबई/प्रतिनिधी** : 'सर्वासाठी न्याय.. जलद न्याय' या तत्वावर राज्य शासन काम करीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली जलद गतीने न्याय मिळण्यासाठी न्यायदान साखळीतील कमतरता दूर करण्यात येत आहे. नवीन फौजदारी कायद्याअंतर्गत जलद न्यायाला प्राधान्य दिले असून त्यानुसार न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे. त्यामुळे न्यायदानाची प्रक्रिया जलद झाली आहे.

न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय अंतर्गत असलेली प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष मोहीम राबविण्याबाबत सूचित केले. तसेच त्यांनी नियमित आढावा घेत या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची प्रक्रिया गतिमान केली. संचालनालयाकडील प्रयोगशाळांमध्ये २०२५ मध्ये एक लाख ८१ हजार प्रकरणे प्रलंबित होती. तसेच दोन लाख ९४ हजार इतकी प्रकरणे आवक झाली. संचालनालयाने विशेष मोहिम राबवून डिसेंबर २०२५ अखेर तीन लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करून ७९ हजार ५४२ इतकी प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी केली आहे.

## महापौर आरक्षण जाहीर होताच राजकीय हालचालींना वेग

दैनिक आपला विदर्भ

**पनवेल/प्रतिनिधी** : राज्य सरकारने गुरुवारी महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर केल्यानंतर पनवेल महापालिकेतील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. पनवेल महापालिकेचे महापौर पद यंदा सर्वसाधारण नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) यासाठी राखीव झाल्याने, कोणाच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडणार याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे.

७८ जागांच्या महापालिका निवडणुकीत भाजप महायुतीचे तब्बल ५९ सदस्य निवडून आल्याने, महापौरपदावर भाजपचाच दावा निश्चित मानला जात आहे. पनवेल महानगरपालिकामध्ये भाजपचे संख्याबळ प्रबळ असल्याने ओबीसी प्रवर्गातून निवडून आलेल्या भाजपच्या सदस्यांमधूनच महापौर निवड होणार आहे. या प्रवर्गातून भाजपच्या ८ महिला आणि ९ पुरुष सदस्यांचा समावेश असल्याने एकूण १७ जणांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे नेमका कोण महापौर होणार, याकडे पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.२०१७ साली पनवेल महापालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत डॉ. कविता चौतमोल यांना महापौरपदाची संधी देत आमदार प्रशांत ठाकूर यांनी उच्चशिक्षित नेतृत्वाचा संदेश पनवेलकरांना दिला होता.

त्यानंतर सर्वसाधारण महिला प्रवर्गाचे आरक्षण आल्यानंतर भाजपच्या अनेक नगरसेविकांनी महापौरपदासाठी तयारी केली होती. मात्र अंतर्गत स्पर्धा वाढत असल्याचे लक्षात आल्यानंतर आणि कोणालाही दुखावले जाऊ नये, या भूमिकेतून पुन्हा डॉ. चौतमोल यांच्यावरच विश्वास ठेवत स्पर्धेला पूर्णविराम देण्यात आला. याच काळात नगरसेविका लीना गरड यांनी आमदार ठाकूर यांच्याविरोधात उघड भूमिका घेतली होती. हा संघर्ष आजही पनवेलच्या राजकारणात चर्चेत आहे.यंदा भाजप पक्षश्रेष्ठी अनुभवी सदस्यांना संधी देणार की अनुभवासोबत उच्चशिक्षण असलेल्या सदस्यावर पसंती दर्शवणार, याबाबत तर्कवितर्क सुरू आहेत.

उच्चशिक्षित, अनुभवसंपन्न आणि आमदार ठाकूर यांच्या विश्वासातील सदस्यालाच हे महापौरपद मिळण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. ओबीसी प्रवर्गातून भाजपकडून महिला सदस्य म्हणून डॉ. अस्मिता घरत, ममता म्हात्रे, प्रतिभा भोईर, राजेश्री वावेकर, विजयश्री पाटील, शिला भगत, सीताबाई पाटील आणि दर्शना भोईर निवडून आल्या आहेत. तर पुरुष सदस्यांमध्ये नितीन पाटील, प्रविण पाटील, ॲड. नरेश ठाकूर, अमर पाटील, प्रदीप भगत, अजय बहिरा, शत्रुघ्न काकडे, बबन मुकादम आणि रविंद्र भगत यांचा समावेश आहे.यापैकी कोण पनवेलचा पुढील महापौर ठरणार, याची घोषणा महापौरपदासाठी अर्ज दाखल करण्याच्या दिवशी भाजपकडून केली जाईल, अशी माहिती पक्षातील सूत्रांकडून देण्यात आली आहे.

## धुळे जिल्ह्याच्या ४७२ कोटी रुपयांच्या प्रारुप आराखड्यास मंजूरी

**धुळे/प्रतिनिधी** : राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत धुळे जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत २०२६-२०२७ च्या रुपये २९२ कोटी १० लक्ष, अनुसूचित जाती योजनेअंतर्गत ३२ कोटी रुपये आणि आदिवासी उपयोजनेअंतर्गत १४८ कोटी ५६ लक्ष अशा एकूण ४७२ कोटी ६६ लक्ष रुपयांच्या प्रारुप आराखड्यास मंजूरी देण्यात आली. हा आराखडा मान्यतेसाठी राज्यस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहे.

पालकमंत्री श्री. रावल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन नियोजन सभागृहात समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीस खासदार डॉ.शोभा बच्छाव,आमदार काशिराम पावरा, श्रीमती मंजुळा गावित, अनुपभैय्या अग्रवाल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सोनार, एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त संजय सैंदाणे, यांच्यासह सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

धुळे जिल्ह्याचा १०० दिवसांचा विकास आराखडा तयार करा – जयकुमार रावल धुळे जिल्ह्याची स्वतंत्र ओळख निर्माण करून पर्यटन, उद्योग, कृषी, शिक्षण व औद्योगिक गुंतवणूक या क्षेत्रांत जिल्ह्याची सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यासाठी धुळे जिल्ह्याचा १०० दिवसांचा विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी भौगोलिक स्थिती, राष्ट्रीय महामार्ग, रस्ते, सिंचन सुविधा, औद्योगिक वसाहती तसेच मनमाड–इंदूर रेल्वे मार्गाचे विस्तारीकरण या संधींचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच दिल्ली–मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर फेज–२ अंतर्गत सोनगीरजवळील भागाचा समावेश होणार असून, देशाचे पंतप्रधान आढावा घेणार असल्याने या संदर्भात उत्कृष्ट सादरीकरण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.




# बुलढाणा जिल्ह्यात पाच नवीन ग्रामपंचायतींची स्थापना

## शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्धः आता ८७५ ग्रामपंचायती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यात ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कामकाजात सुलभता यावी तसेच नागरिकांना मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीनुसार व शासनाच्या निकषांची पूर्तता होत असलेले प्रस्ताव जिल्हा परिषद बुलढाणा यांच्यामार्फत शासनाकडे सादर करण्यात आले होते. त्यानुसार जिल्ह्यात नव्याने पाच ग्रामपंचायतींची स्थापना करण्याबाबत शासन राजपत्रात स्वतंत्र अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींपैकी संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेअंतर्गत दोन तर सर्वसाधारण निकषांतर्गत तिन ग्रामपंचायतींचा समावेश आहे. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेअंतर्गत चिखली तालुक्यातील ग्रामपंचायत अंचरवाडीचे विभाजन करून वसंतनगर, मेहकर तालुक्यातील ग्रामपंचायत विश्विचे विभाजन करून राजगड येथे नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या आहेत. तर सर्वसाधारण निकषांअंतर्गत लोणार तालुक्यातील ग्रामपंचायत पारडाचे विभाजन करून धायफळ, जळगाव जामोद तालुक्यातील ग्रामपंचायत रसूलपूरचे विभाजन करून वायाळ (निमखेडी), तसेच ग्रामपंचायत सुनगावचे विभाजन करून चालठाणा खुर्द येथे नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या आहेत.




या निर्णयामुळे बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची संख्या ८७० वरून ८७५ झाली आहे. नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर त्या नियमानुसार गठित होतील. जळगाव जामोद तालुक्यातील आदिवासी बहुल वायाळ (निमखेडी) व चालठाणा खुर्द, तसेच लोणार तालुक्यातील मूळ ग्रामपंचायत पारडापासून तब्बल २४ किलोमीटर अंतरावर असलेल्या धायफळ गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेच्या जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व सहअध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच समितीचे अशासकीय सदस्य डॉ. प्रशांत गलसिंग राठोड(मेहकर) व दीपक शिवसिंग साबळे (तरोडा) यांच्या पाठपुराव्यामुळे बंजारा तांडा भागासाठी वसंतनगर व राजगड या नवीन ग्रामपंचायतींची निर्मिती सुलभ झाली.

नवीन ग्रामपंचायतींच्या निर्मितीसाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्यामध्ये संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले असल्याचे मत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) शिवशंकर भारसाकळे यांनी व्यक्त केले आहे. तसेच निकषांची पूर्तता होत असलेल्या ग्रामपंचायतींनी अधिक माहितीसाठी व प्रस्ताव सादर करण्यासाठी संबंधित पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

CMYK

## जबाबदारीचे महत्व संकटातून समजते

जागतिक राजकारणात सत्ता दोन प्रकारे वापरली जाते. एक– थेट लष्कर, पैसा आणि दबाव यांच्या जोरावर. दुसरी– सूक्ष्म निर्देशांक, अहवाल, रँकिंग आणि नैतिक शिकवण यांच्या माध्यमातून. गेली अनेक दशके दुसरी सत्ता प्रामुख्याने पाश्चिमात्य देशांकडे होती. कोण लोकशाहीवादी, कोण जबाबदार, कोण पर्यावरणप्रेमी आणि कोण 'समस्याग्रस्त' हे ठरवण्याचा सर्वस्वी अधिकार, जणू ठेकाच या राष्ट्रांनी स्वतःकडेच ठेवला. या प्रक्रियेत मोजमाप कमी आणि निवाडेच अधिक झाले. अशा पार्श्वभूमीवर भारताने 'जबाबदार राष्ट्रे निर्देशांक' (रिस्पॉन्सिबल नेशन्स इंडेस) जाहीर करणे, ही आकड्यांची घोषणा नसून, मक्तेदारी मोडून काढण्याची घोषणा आहे. या पहिल्याच निर्देशांकात सिंगापूर पहिल्या क्रमांकावर, भारत १६व्या स्थानी आणि दशकानुदशके स्वतःला 'जागतिक सदसद्विवेकबुद्धी' असे म्हणवणारी अमेरिका, तसेच 'विकासाचे मॉडेल' असे म्हणत मिरवणारा चीन या दोन महासत्ता भारताच्या मागे आहेत, हा योगायोग नाही. हा बदलत्या काळाचा इशारा आहे. कारण, इथे प्रश्न कोण पहिला आला याचा नसून, कोण मोजतो आहे; याचा आहे. 'आरएनआय'ची संकल्पना तशी साधी वाटते; पण तिचे राजकारण गुंतागुंतीचे आहे. राष्ट्राची जबाबदारी म्हणजे नेमके काय? फक्त मोठी अर्थव्यवस्था असणे की, प्रचंड लष्करी ताकद? भारताचा हा निर्देशांक सांगतो की, जबाबदारी प्रशासनातून दिसते, समाजातील दुर्बल घटकांना दिलेल्या संधींतून दिसते, पर्यावरणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातून दिसते आणि जागतिक संकटांच्या वेळी घेतलेल्या भूमिकेतून दिसते. म्हणजेच सत्ता आहे की नाही, यापेक्षा ती कशी वापरली जाते; हा खरा मुद्दा आहे. आतापर्यंतचे बहुतांश जागतिक निर्देशांक हे एका विशिष्ट चौकटीतून आले. पाश्चिमात्य समाजरचना, त्यांचा इतिहास आणि त्यांची राजकीय प्राधान्ये यांच्याच निकषांवरच जगातील सर्व काही भलेबुरे मोजले गेले. विकसनशील देशांचे वास्तव, लोकसंख्येचा भार, दारिद्र्याशी चाललेली झुंज आणि मर्यादांमधून केलेली प्रगती या गोष्टींना फारशी दखल मिळाली नाही. परिणामी, निर्देशांक हे आरसे कमी आणि शिक्के जास्त ठरले. कुणाला नापास ठरवायचे आणि कुणाला आदर्श म्हणायचे, हे आधीच ठरलेले असायचे. भारताचा 'आरएनआय' या मानसिकतेलाच प्रश्न विचारतो. तो असे सांगत नाही की, भारत सर्वार्थाने सर्वोत्तम आहे. उलट, भारत स्वतः १६व्या स्थानी आहे, हा निर्देशांक आत्मस्तुतीसाठी नाही, हेच यातून नेमकेपणाने सांगितले जाते. पण, हा निर्देशांक हे नक्की सांगतो की, जबाबदारीची व्याख्या काही मोजक्या देशांची मक्तेदारी असू शकत नाही. प्रत्येक देश वेगळ्या परिस्थितीतून पुढे जातो आणि तरीही काही मूलभूत मूल्ये सर्वांना लागू पडू शकतात. ही समतोल भूमिका भारत या निर्देशांकातून मांडतो. भारतासाठी हा निर्देशांक महत्त्वाचा का आहे? कारण, भारत कायमच इतरांच्या निकषांवर तपासला गेला. लोकशाही शिकवण, मानवाधिकारांचे धडे, पर्यावरणीय उपदेश हे सगळे भारताने ऐकले. कधी–कधी ते योग्यही होते; पण अनेकदा या विकसित राष्ट्रांची त्यामागे राजकीय सोयच अधिक होती. आता भारत म्हणतो की, चर्चा एकतर्फी नको; मोजमाप सर्वांनाच लागू पडू दे. हा आत्मविश्वास एका परिपक्व राष्ट्राचाच असू शकतो. जागतिक पातळीवर 'आरएनआय'चे महत्त्व आणखी व्यापक आहे. जग एकध्रुवीयतेकडून बहुध्रुवीयतेकडे सरकत आहे. सत्ताकेंद्रे वाढत आहेत; पण विश्वास कमी होत आहे. अशा वेळी 'जबाबदारी' हा नवा निकष ठरतो. हवामान–बदलावर मोठमोठी भाषणे करणारे देश प्रत्यक्षात काय करतात? मानवाधिकारांचे धडे देणारे देश शस्त्रविक्रीत किती पुढे आहेत? पर्यावरणाबाबत उपदेश करणाऱ्यांची स्वतःची कार्बन पातळी किती आहे? असे प्रश्न विचारण्याची हिंमत 'आरएनआय' करतो. 'विश्वगुरू' ही संकल्पना अनेकदा उपहासाचा विषय ठरवली जाते. पण, भारताने ती कधीही स्वतःची शेखी मिरविण्यासाठी मांडलेली नाही. विश्वगुरू म्हणजे इतरांना कमी लेखणारा नव्हे, तर स्वतःच्या अनुभवातून मार्ग दाखवणारा. 'कोविड' काळात भारताने लसींच्या माध्यमातून हे संपूर्ण जगाला दाखवले. डिजिटल व्यवहारांत 'यूपीआय'ने तंत्रज्ञान सामान्य माणसाच्या हातात दिले. 'इस्रो'ने कमी खर्चात मोठी स्वप्ने साकार होऊ शकतात, हे सिद्ध केले. संरक्षण क्षेत्रात आयातीवर अवलंबून असलेला देश निर्यातदार बनू शकतो, हे दाखवून दिले. ही उदाहरणे वास्तवातील आहेत, याचा गाजावाजा भारताने केलेला नाही. 'आरएनआय'मधून भारत जगाला एक अस्वस्थ करणारा प्रश्न विचारतो आणि तो हा की, विकास आणि जबाबदारी खरेच परस्परविरोधी आहेत का? आर्थिकवाढीसाठी पर्यावरणाचा बळी द्यायलाच हवा, हा पाश्चिमात्य औद्योगिक इतिहास सांगतो. पण, तोच इतिहास आज जगाला संकटात टाकतो. भारत म्हणतो, वेगळा मार्ग शक्य आहे. समतोल साधता येतो आणि तो समतोल मोजता येतो. या सगळ्यात 'ग्लोबल साऊथ'चा मुद्दाही तितकाच महत्त्वाचा. आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील देश आजही जागतिक चर्चेत दुय्यम भूमिकेत आहेत. त्यांच्या अडचणी वेगळ्या; पण मोजमाप मात्र पाश्चिमात्य. भारताचा 'आरएनआय' या देशांना सांगतो की, तुमचा आवाज ऐकला जाऊ शकतो आणि तुमची प्रगती तुमच्या वास्तवाच्या चौकटीत मोजली जाऊ शकते. भारत स्वतः पुढे जात असताना इतरांनाही सोबत घेण्याचा हा प्रयत्न आहे. अर्थात, हा निर्देशांक टीकेपासून मुक्त राहणार नाही. त्याची संशोधन पद्धत, निकषांची निवड, आकड्यांची अचूकता या सगळ्यांवर प्रश्न विचारले जातील. ते विचारलेच पाहिजेत; पण एक गोष्ट स्पष्ट आहे, भारताने 'मोजले जाणे' स्वीकारण्याऐवजी 'मोजणे' सुरू केले आहे. ही भूमिका बदलली आहे. जागतिक राजकारणात भाषा बदलली की, वास्तव बदलायला सुरुवात होते. 'जबाबदार राष्ट्रे निर्देशांक' ही भाषाच बदलण्याची सुरुवात आहे.

# जल जीवन मिशन अंतर्गत 'जल सेवा आंकलन' प्रभावीपणे राबवूया – गुलाबराव खरात मुकाअ जि. प. बुलढाणा

## ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या कार्यक्षमतेचे ग्रामपंचायत नेतृत्वाखाली मूल्यांकन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** : ग्रामीण भागातील कुटुंबांना नियमित, पुरेशा प्रमाणात व गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी शाश्वतपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी 'जल सेवा आंकलन' या ग्रामपंचायतच्या नेतृत्वाखालील मूल्यांकन साधनाचे कार्यान्वयन करण्यात आले आहे. सदर अभियान प्रभाविने राबविण्याचे आवाहन जिल्हा परिषद बुलढाणा चे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी केले आहे.

आतापर्यंत जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांचे कार्यक्षमता मूल्यांकन ठराविक कालावधीत तृतीय पक्ष सर्वेक्षणांद्वारे करण्यात येत होते. मात्र, गावपातळीवरील पाणी सेवांसाठी सतत, स्थानिक मालकीची व पारदर्शक देखरेख यंत्रणा संस्थात्मक करणे आवश्यक असल्याने 'जल सेवा आंकलन' या अभिनव उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

जल सेवा आंकलन : संकल्पना व उद्दिष्टे जल सेवा आंकलन म्हणजे गावातील पाणीपुरवठा सेवांची कामगिरी ग्रामपंचायत व गाव पाणी व स्वच्छता समिती यांच्या नेतृत्वाखाली पद्धतशीरपणे मूल्यांकन करणे होय. या उपक्रमाचे उद्घाटन दि. ३० डिसेंबर, २०२५ रोजी केंद्रीय मंत्री, जलशक्ती मंत्रालय, नवी दिल्ली सी. आर. पाटील, यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे केले आहे.

या मूल्यांकनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कुटुंबांना पाणीपुरवठा नियमितपणे, पुरेशा प्रमाणात व स्वीकार्य गुणवत्तेनुसार मिळत आहे का, तक्रारींचे निवारण कसे होत आहे, वापरकर्ता शुल्क संकलनाची स्थिती, तसेच पाणीपुरवठा यंत्रणेची संचालन व देखभाल याबाबतची माहिती नोंदविण्यात येणार आहे.



**जल सेवा आंकलनची प्रमुख उद्दिष्टे**

- ग्रामपंचायत व गाव पाणी व स्वच्छता समिती यांना पाणीपुरवठा योजनांच्या कामगिरीचा पद्धतशीर आढावा घेण्यासाठी सक्षम करणे.
- गावपातळीवर मालकीभावना व जबाबदारी अधिक बळकट करणे.
- पारदर्शक व समुदाय–आधारित सेवा माहितीची खात्री करणे.
- जिल्हा व राज्य पातळीवर नियोजन व सहाय्यक उपक्रमांसाठी विश्वसनीय माहिती उपलब्ध करणे.
- ग्रामीण पाणीपुरवठा व्यवस्थेतील शाश्वत संचालन, देखभाल व नागरिकांचा विश्वास दृढ करणे.

**संस्थात्मक कार्यप्रवाह**

गाव पाणीपुरवठा व स्वच्छता समिती / पाणी समितीमार्फत संचालन व देखभाल, दुरुस्ती, तक्रारी व वापरकर्ता शुल्क संकलनाची नोंद ठेवण्यात येणार आहे. यासोबतच ग्रामसभेमध्ये पाणीपुरवठा योजनेची सर्व माहिती व निष्कर्ष मांडून त्यावर चर्चा करून पारदर्शकता राखली जाणार आहे. ग्रामपंचायत सचिव ई–ग्रामस्वराज पोर्टलवरील 'मेरी पंचायत' लॉगिन लिंकद्वारे पंचायत डॅशबोर्डवर अंतिम मंजूर जल सेवा अंकलन तपशील प्रविष्ट करतील. प्रविष्ट केलेली माहिती 'मेरी पंचायत' ॲपद्वारे नागरिकांना दृश्यमान होणार असून नागरिकांकडून अभिप्राय देण्याची सुविधाही उपलब्ध असेल. तालुका पाणी व स्वच्छता मिशन कक्ष () सहाय्य आवश्यक असलेल्या गावांची ओळख करून समस्या निवारणास मदत करेल, तर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन जिल्हास्तरीय ट्रेंड्सचा आढावा घेऊन प्रणालीस्तरीय सुधारणा व नियोजनासाठी आवश्यक निर्णय घेईल.

तालुका प्रशासनाची भूमिका पाणीपुरवठा योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तालुका प्रशासनाचे नेतृत्व अत्यंत महत्त्वाचे असून, तालुकास्तरीय समन्वय बैठकांचे आयोजन, ग्रामपंचायतींना अंमलबजावणीमध्ये सहकार्य, तसेच योजना संचालनातील अडचणी सोडविण्याची जबाबदारी तालुका प्रशासनावर असेल. ग्रामपंचायत अधिकारी व गाव पाणी व स्वच्छता समिती सदस्यांसाठी जल सेवा आंकलन फ्रेमवर्क, पंचायत डॅशबोर्डवर माहिती नोंदणी याबाबत प्रशिक्षण व क्षमता बांधणीस तालुका प्रशासनाने पाठिंबा द्यावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**मूल्यांकनाची कालमर्यादा**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीसाठी जल सेवा आंकलन मूल्यांकनाचा पहिला टप्पा २६ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल' घोषित बुलढाणा जिल्ह्यातील २२७ गावांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार असून, तालुकास्तरीय जल जीवन मिशन उपक्रमाचे सक्रिय नेतृत्व महत्त्वाचे ठरणार आहे. जल सेवा आंकलन यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी प्रकल्प संचालक जल जीवन मिशन सतीश देशमुख आणि कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभागअनिल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

## 'हिंद–दी–चादर' कार्यक्रमानिमित्त २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड शहरात वाहतूक नियमन

**नांदेड/प्रतिनिधी** : ''हिंद–दी–चादर'' या कार्यक्रमानिमित्त दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरात देशातील व राज्यातील अनेक अतिमहत्वाचे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये केंद्रीय गृहमंत्री मंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती रेखा गुप्ता, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश आहे. हे सर्व मान्यवर नांदेड येथील मोदी मैदान येथे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास देश–विदेशातून मोठ्या प्रमाणावर भाविक दाखल होणार असल्याने नांदेड शहरात वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहरातील शांतता, सुव्यवस्था व वाहतुकीचे सुरळीत नियोजन राखण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३६ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत वाहतूक नियमनाबाबत अधिसूचना निर्गमित केली आहे.

या कालावधीत व्हीव्हीआयपी दौऱ्यादरम्यान तात्पुरत्या स्वरूपात आसना ब्रिजशंकरराव चव्हाण चौकगुरुद्वारा मालटेकडी रोडमालटेकडी ओव्हरब्रिज, नमस्कार चौक ते नाईक चौक, अण्णाभाऊ साठे पुतळा, हिंगोली गेट ओव्हरब्रिज, चिखलवाडी चौक, आय. टी.आय. ते अण्णाभाऊ साठे पुतळा, अण्णाभाऊ साठे पुतळा ते नाईक चौक (आनंदनगरकडे), हिंगोली गेट अंडरब्रिज ते अण्णाभाऊ साठे पुतळा, चिखलवाडी ते हिंगोली गेट ओव्हर/अंडरब्रिज, चिखलवाडी ते गुरुद्वारा हनुमान मंदिरभगतसिंग चौक, बर्की चौक ते जुना मोंढा मार्गे वजिराबाद, कविता हॉटेल ते जुना मोंढा कौठा, एम.जी. हेक्टर शोरूम ते साई कमान कौठा, भगतसिंग चौक ते श्रीराम चौक (पूर्व बाजू), अहिल्यादेवी होळकर चौकमामा चौक, बी.डी.डी.एस. ऑफिस ते मामा चौकश्रीराम चौक, लिंबगाव ते वाघी रोडहसापूर मार्ग (कार्यक्रमास येणारी वाहने वगळून), रविनगर ते नागार्जुन शाळा तसेच कौठा चौकी ते रविनगर, बसवेश्वर पुतळा ते अहिल्याबाई होळकर चौकपदमजासिटीभगतसिंग चौक हे मार्ग वाहतुकीस बंद राहणार आहेत.

वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग म्हणून चिखलवाडीअण्णाभाऊ साठे पुतळानाईक चौककडे जाणारी वाहतूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, कोर्टाच्या पाठीमागून हिंगोली गेट अंडरब्रिज मार्गे गोकुळनगरकडे वळविण्यात येईल. तसेच वजिराबाद चौकआय.टी.आपनवीन मोंढामहादेव दाल मिल मार्ग, महादेव दाल मिल रोड क्रमांक २६, शिवाजी महाराज पुतळारेल्वे स्टेशनहिंगोली गेट, बसवेश्वर चौक ते लातूर फाटा, लिंबगावभवानी चौकछत्रपती चौक मार्गे वाहतूक सुरू राहील. नागरिकांनी दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत वाहतुकीस अडथळा होऊ नये यासाठी प्रशासनाने जाहीर केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

# श्री गुरु तेग बहादूर : मानवजातीचे खरे तारणहार

'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्षे पुर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम राज्यस्तरीय समिती मार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी कार्यक्रम होत आहे. या निमित्ताने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अनमोल कार्याची ही माहिती...

महान योद्धा, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व आणि मातृभूमीचे प्रेमी नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजी यांनी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची मानवता सदैव ऋणी राहील. त्यांनी विश्वबंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. धर्म, मातृभूमी आणि लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी जाती–धर्माचा विचार न करता सर्वस्वाचा त्याग केला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या दुर्मिळ सन्मानाने गौरवण्यात आले. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचा ३५० वा शहिदी समागम वर्ष साजरा करत असताना, धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व आणि मानवजातीच्या व मातृभूमीच्या कल्याणाविषयी शिकवण देणाऱ्या त्यांच्या महान आदर्शांना पुन्हा समर्पित करणे आवश्यक आहे. अतुलनीय श्री गुरु तेग बहादूरजींनी आपल्याला निर्भयपणे मुक्त जीवन जगण्याची शिकवण दिली. मुघल सम्राट औरंगजेबाने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर केलेल्या अत्यंत छळास ते शरण गेले नाहीत, तर दैवी शांततेने तो सहन केला. त्यागमल ते तेग बहादूर



असे झालेले त्यांचे परिवर्तन मानवी इतिहासात फार कमी समांतर असलेली धार्मिक दृढता, औचित्य, नैतिकता आणि शौर्याची कथा आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण सत्याचा मार्ग सोडला नाही. त्यांच्या देवत्वाची अशी शक्ती होती की जेव्हा त्यांच्या शिष्यांना त्यांच्या समोर मारण्यात आले, तेव्हा ते खोल ध्यानात राहिले. जेव्हा त्यांनी स्वतः परम त्याग केला, तेव्हाही ते ध्यानात मग्न होते. श्री गुरु तेग बहादूरजी म्हणाले की धर्म हा केवळ पूजा–पाठ नसून कर्तव्य आहे आणि एक आदर्श जीवनपद्धती आहे. आजच्या तरुण पिढीने श्री गुरु तेग बहादूरजींच्या जीवनातून, चारित्र्यातून आणि त्यागातून प्रेरणा घेऊन मानवता आणि नैतिक मूल्ये अंगीकारण्याची गरज आहे, जेणेकरून भारत पुन्हा विश्वगुरू होईल. अत्याचार आणि अन्यायापुढे झुकण्यास त्यांनी ठाम नकार दिला. त्यांनी आदर्श आणि तत्त्वांच्या मार्गावर चालण्याची निवड केली. काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ श्री गुरु तेग बहादूरजींना भेटण्यासाठी आजच्या श्री आनंदपूर साहिब येथे आले, ज्याला चक्क नानकी असेही म्हणतात. त्यांचे म्हणणे धीराने ऐकून घेतल्यानंतर, त्यांनी त्यांना औरंगजेबाला किंवा त्याच्या माणसांना सांगण्यास सांगितले की जर त्यांचे गुरू धर्म सोडतील, तरच ते आपला धर्म सोडतील. त्यानंतर औरंगजेबाने केलेले कारनामे इतके भयानक होते की आजही त्यांची आठवण झाल्यावर अंगावर काटा उभा राहतो. श्री गुरु तेग बहादूरजी आणि त्यांच्या तीन भक्तांना –भाई सती दास, भाई मती दास आणि भाई दयाला – बंदिवान करण्यात आले. त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्यावर त्या उदात्त त्रिकूटांना त्यांच्या गुरूंसमोर फाशी देण्यात आले. त्यांनी धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. इ.स. १६७५ मध्ये श्री गुरु तेग बहादूरजींनी अत्यंत शांतपणे हौतात्म्य पत्करले. जुन्या दिल्लीतील चांदणी चौकातील गुरुद्वारा शीशगंज साहिब हे 'त्याग' आणि 'बलिदान' यांच्या अंतिम गाथेचे प्रतीक आहे, ज्याला मानवी इतिहासात तोड नाही. भाई जैता सिंग यांनी श्री गुरु तेग बहादूरजींचे पवित्र शीश श्री आनंदपूर साहिब येथे नेले, जे जगभरातील शीखांसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे. त्यांच्या बलिदानामुळे 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर आधारित प्राचीन सभ्यता आणि संस्कृती केवळ नष्ट होण्यापासून वाचली नाही, तर एक दृढ आणि सर्वसमावेशक राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये तो एक ऐतिहासिक टप्पा ठरला. शीख धर्माचा पाया हा मानवी इतिहासातील सामान्य विकास नव्हता, तर तो सर्व प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध मानवतेची ढाल बनला. ही एक महान परंपरा होती आणि आजही आहे. नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजींनी केवळ लोकांचा धर्मरक्षणाचा संकल्प जपला आणि बळकट केला नाही, तर शीख धर्माला महानतेच्या पुढील स्तरावर नेले. श्री गुरु तेग बहादूरजींना माहीत होते की त्यांच्या भक्तांनी कोणताही पश्चात्ताप न करता धर्मासाठी किंमत मोजली. त्यांनी सर्व मोह नाकारले, सर्व वेदना आणि त्रास सहन केले, पण अश्रू ढाळले नाहीत. धर्मकार्यावरील त्यांची बांधिलकी आणि श्रद्धा अतूट होती. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे धर्म आणि मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अतुलनीय बलिदानांचे सर्वोच्च उदाहरण आहे. औरंगजेबाच्या क्रूरतेपुढे त्यांनी कधीही शरणागती पत्करली नाही. प्रत्येक प्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट होते – मी शीख आहे आणि शीखच राहणार! श्री गुरु तेग बहादूरजींच्या शिकवणीतून आणि त्यागातून आपल्याला अनेक आणि बहुआयामी धडे मिळतात. त्यांचा त्याग, सत्यावरील अढळ विश्वास, अहिंसा आणि सर्वांप्रती परोपकारी दृष्टीकोन आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला, जेणेकरून प्रत्येक मानवाला आपल्या आवडीचे जीवन जगता येईल. धर्म हे सर्वांचे कर्तव्य आहे. खरा धर्म आपल्याला सर्वांशी चांगले वर्तन करण्याची आणि समाजाची शक्य तितकी सेवा करण्याची शिकवण देतो. त्यांनी दुर्बल आणि वंचितांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांचे पुत्र श्री गुरु गोविंद सिंगजी यांनी केवळ वडिलांची तत्त्वे आणि मूल्ये जपली नाहीत, तर खालसा निर्माण करून त्यांना पुढे नेले, जो धार्मिकता आणि न्यायासाठी लढण्याचे प्रतीक आहे. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचे हे महान वचन सदैव लक्षात ठेवले पाहिजे –''आपण आपले जीवन सुख–दुःखात तसेच मान–अपमानात समान भावनेने जगले पाहिजे.'' त्यांच्या शिकवणीतून जीवनाचा उद्देश तसेच समता, समरसता आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित होते. श्री गुरु तेग बहादूरजींचे महान शब्द हे मानवतेसाठी ऊर्जा आणि ज्ञानाचे चिरंतन स्रोत आहेत. गुरूंच्या शब्दांच्या मधुर पठणाचा भक्तांवर खोल परिणाम होत असे. त्यांनी अत्यंत शांततापूर्ण आणि मानवतावादी मार्गाने निरंकुश व धर्मांध शासकाशी संघर्ष केला. त्यांची शिकवण कालातीत आहे आणि येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला शांततेने आणि खंबीरतेने सामोरे जाण्याची तसेच सौहार्द, न्याय, समता आणि समरसतेवर आधारित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा देते.

**अनिल आलुरकर**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
अमरावती

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांची कार्यक्रमस्थळी पाहणी तयारी अंतिम टप्प्यात

**नांदेड/प्रतिनिधी :** ''हिंद-दी-चादर'' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा भव्य कार्यक्रम दि. २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी नांदेड येथे मोठ्या प्रमाणावर भाविक येणार असल्याने, त्यांच्या सोयी-सुविधांच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कामांची पाहणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कार्यक्रम स्थळी भेट देऊन पाहणी केली.यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी मैदानाची सज्जता, प्रवेश व निर्गमन मार्ग, वाहनतळ व्यवस्था, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा, सुरक्षा व आपत्कालीन व्यवस्थापन,लंगर व्यवस्था, मुख्य मंडप आदी बाबींच्या कामाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने व काटेकोरपणे काम वेळेत पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी दिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सर्व यंत्रणा सज्ज असून, कार्यक्रमपूर्व तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

पान १ वरून...

## महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी महापौर आरक्षण सोडत जाहीर

नागपूर महानगरपालिका - खुला प्रवर्ग (महिला)
नांदेड-वाघाळा महानगरपालिका - खुला प्रवर्ग (महिला)
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका - खुला प्रवर्ग
नाशिक महानगरपालिका - खुला प्रवर्ग (महिला)
नवी मुंबई महानगरपालिका - खुला प्रवर्ग (महिला)
परभणी महानगरपालिका - खुला प्रवर्ग
सांगली-मिरज महानगरपालिका - खुला प्रवर्ग
वसई-विरार महानगरपालिका - खुला प्रवर्ग
सोलापूर महानगरपालिका - खुला प्रवर्ग
महिलांसाठी महापौरपद राखीव झालेल्या महानगरपालिका कोणत्या?
मुंबई महानगरपालिका - खुला प्रवर्ग
जालना महानगरपालिका - अनुसूचित जाती
लातूर महानगरपालिका - अनुसूचित जाती
अहिल्यानगर महानगरपालिका - ओबीसी
अकोला महानगरपालिका- ओबीसी
चंद्रपूर महानगरपालिका - ओबीसी
जळगाव महानगरपालिका - ओबीसी
धुळे महानगरपालिका - खुला प्रवर्ग
पुणे महानगरपालिका - खुला प्रवर्ग
नागपूर महानगरपालिका - खुला प्रवर्ग
नांदेड-वाघाळा महानगरपालिका - खुला प्रवर्ग
नवी मुंबई महानगरपालिका - खुला प्रवर्ग
मीरा-भाईंदर महानगरपालिका - खुला प्रवर्ग
नाशिक महानगरपालिका - खुला प्रवर्ग
मालेगाव महानगरपालिका - खुला प्रवर्ग

**कोणत्या महानगरपालिकांमध्ये महापौरपद OBC वर्गासाठी राखीव?**

इचलकरंजी महानगरपालिका - ओबीसी
पनवेल महानगरपालिका - ओबीसी
अहिल्यानगर महानगरपालिका- ओबीसी (महिला)
अकोला महानगरपालिका - ओबीसी (महिला)
उल्हासनगर महानगरपालिका - ओबीसी
कोल्हापूर महानगरपालिका- ओबीसी
चंद्रपूर महानगरपालिका- ओबीसी (महिला)
जळगाव महानगरपालिका - ओबीसी (महिला)

# समाजकल्याण विभागांतर्गत जिल्हास्तरीय बैठका नियमित घेण्याचे विभागीय आयुक्तांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर विभागातील समाजकल्याण विभागांतर्गत तृतीयपंथी तक्रार निवारण समिती, जादूटोणा विरोधी कायदा अंमलबजावणी समिती व दक्षता समितीच्या जिल्हास्तरावरील बैठका नियमित घेण्यात याव्यात व जिल्हास्तरावरील समितीकडे प्राप्त तक्रार प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज येथे दिले.



विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली समाजकल्याण विभागांतर्गत तृतीयपंथी तक्रार निवारण समिती, जादूटोणा विरोधी कायदा व दक्षता समितीची आढावा बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात घेण्यात आली. यावेळी नागरी हक्क संरक्षण छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राच्या डॉ. अनिता जामदार (भापोसे), छत्रपती संभाजीनगर जिल्याण्चे समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त डॉ. दीपक खरात, लातूर जिल्यावेतील समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, विभागीय तृतीयपंथी समितीचे शेख सीमा नायर हे बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित होते तर विभागातील समाज कल्याण विभाग जिल्हास्तरीय समितीचे सदस्य तथा प्रशासकीय अधिकारी दुरदृश्य प्रणालीव्दारे उपस्थित होते.

अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत घडलेल्या गुन्ह्यातील पीडितांचे मदत व पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करून प्रस्ताव जिल्हा दक्षता समितीमार्फत शासनास पाठवावेत. तसेच कागदपत्रांअभावी प्रलंबित असणाऱ्या प्रकरणांची कागदपत्रे तत्काळ जमा करण्याच्या सूचना श्री. पापळकर यांनी दिल्या. त्याचबरोबर जिल्ह्यांत घडलेल्या गंभीर गुन्ह्यांच्या प्रकरणात संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रत्यक्ष भेटी द्याव्यात व प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देशही विभागीय आयुक्त श्री.पापळकर यांनी दिले.

जिल्ह्यांनी तृतीयपंथीयांचे हक्क व अधिकार यांचे संरक्षणाच्या अनुषंगाने तृतीयपंथीयांना नॅशनल पोर्टल फॉर ट्रांसजेंडर (टीजी) पोर्टलवरून तृतीयपंथीयांना ओळखपत्र व प्रमाणपत्र उपलब्ध करून द्यावेत.

जादूटोणा विरोधी अधिनियम २०१३ अंतर्गत जादूटोणा, अंधश्रद्धा इतर अमानुष कृत्यांना आळा घालण्याच्या दृष्टीनेही जिल्हा स्तरावर नियमित बैठका घेऊन प्राप्त प्रकरणांवर वेळेत कारवाई करण्याच्या सुचना यावेळी श्री. पापळकर यांनी यावेळी दिल्या.

## जेलर २चं क्लायमॅक्स होईल केरळमध्ये शूट

**मुंबई/प्रतिनिधी :** साऊथ सुपरस्टार रजनीकांतच्या आगामी जेलर २ चित्रपटाच्या रिलीजची बऱ्याच काळापासून चाहते वाट पाहत आहेत. या चित्रपटाची शूटिंग वेगवेगळ्या ठिकाणी होत आहेत. दरम्यान, रजनीकांत चित्रपटाच्या शूटिंगसाठी केरळमध्ये पोहोचला आहे. सोशल मीडियावर काही व्हिडिओ आणि फोटो व्हायरल झाले आहेत. यात रजनीकांत दिग्दर्शक नेल्सन दिलीपकुमारबरोबर कोची विमानतळावर असल्याचे दिसत आहेत. याशिवाय फ्लाइटमधील देखील काही फोटो व्हायरल झाले आहेत. या फोटोमध्ये सुपरस्टार्स सेल्फीसाठी पोझ देताना दिसत आहेत. जेलर २ चित्रपटाचं क्लायमॅक्स केरळमध्ये शूट होणार असल्याचं समजत आहे. मंगळवारी केरळमध्ये चित्रपटाच्या क्लायमॅक्सचे शूटिंग सुरू करण्यात येत आहेत.

केरळमध्ये जेलर २चं शूटिंग : आता दिग्दर्शक नेल्सन दिलीप कुमार यांचा कोची विमानतळावरील व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. गेल्या वर्षभरापासून जेलर २चं शूटिंग देशाच्या विविध भागात होत आहे. यापूर्वी रजनीकांत तामिळनाडू, हैदराबाद आणि म्हैसूरमध्येही दिसला होता. दरम्यान व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये अभिनेता कॅज्युअल ब्लॅक टी-शर्ट आणि राखाडी पँट घातलेले दिसत आहेत. नेल्सन दिलीप कुमार लिखित आणि दिग्दर्शित जेलर २ची निर्मिती कलानिधी मारन सन पिक्चर्सच्या सहकार्यानं होत आहे. गेल्या वर्षभरापासून निर्मिती सुरू असलेल्या या चित्रपटाचं शूटिंग फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे, हा चित्रपट १२ जूनपर्यंत प्रदर्शित होईल असेही म्हटलं जात आहे.

# आधी दारू पाजली, नंतर सत्तूरने वार अनब...; सोन्याच्या चैनीसाठी मित्रानेच काढला मित्राचा काटा

### गडचिरोलीतील आरडी एजंट प्रकरणाचा उलगडा

दैनिक आपला विदर्भ

**गडचिरोली/प्रतिनिधी** :गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यात आलापल्ली परिसरात घडलेल्या आरडी एजंटच्या हत्येचा थरारक उलगडा अखेर अहेरी पोलिसांनी केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे ही हत्या कुण्या अनोळखी व्यक्तीने नव्हे, तर मित्रानेच मित्राच्या सोन्याच्या चैनसाठी रचलेल्या कटातून झाल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीने आधी दारू पाजली अनब नंतर संधी साधत सत्तूरने वार करून निर्घृण हत्या केली.

आलापल्ली येथील पतसंस्थेत अभिकर्ता म्हणून काम करणारे रवींद्र नामदेवराव तंगडपल्लीवार (वय ४९, रा. नागेपल्ली) हे १८ जानेवारी रोजी सकाळी साडेअकरा वाजता ''पतसंस्थेत पैसे भरायला जातो'' असे कुटुंबीयांना सांगून घराबाहेर पडले होते. मात्र रात्रीपर्यंत ते घरी परतले नाहीत. दुसऱ्या दिवशी आलापल्ली-सिरोंचा मार्गावरील नागमाता मंदिराजवळ त्यांचा रक्तबंबाळ अवस्थेतील मृतदेह आढळून आला. धारदार शस्त्राने वार करून त्यांची हत्या करण्यात आल्याचे स्पष्ट झाले.

घटनेनंतर अहेरी पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. ठसेतज्ज्ञ व न्यायवैद्यक शास्त्राच्या पथकाला पाचारण करून घटनास्थळावरून पुरावे गोळा करण्यात आले. तसेच दोन स्वतंत्र पथके आरोपीच्या शोधासाठी रवाना करण्यात आली. तिसऱ्या दिवशी पोलिसांनी या हत्येचा छडा लावत समय्या मलय्या सुंकरी (वय ३५, रा. मद्दीगुडम, ता. अहेरी) याला अटक केली. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी समय्या याला दारूचे प्रचंड व्यसन होते. दारू पिण्यासाठी त्याच्याकडे पैसे नसल्याने त्याने मित्र रवींद्र यांच्या गळ्यातील सोन्याची चैन पाहून ती लुटण्याचा कट आखला.

आरडी काढायची आहे, असे सांगत त्याने रवींद्र यांना फोन करून बाहेर बोलावले. त्यानंतर दोघेही सिरोंचा मार्गावरील नागमंदिर परिसरातील निर्जन स्थळी गेले. तेथे मद्यप्राशन केल्यानंतर रवींद्र पूर्णपणे नशेत असल्याची खात्री झाल्यावर आरोपीने सत्तूरने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. जीव वाचवण्यासाठी रवींद्र यांनी हाताने प्रतिकार केला असता त्यांच्या बोटांवर घाव बसून बोटे कापली गेली. तरीही आरोपी थांबला नाही. रवींद्र यांचा मृत्यू होईपर्यंत त्याने सत्तूरने अनेक वार केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

हत्या केल्यानंतर आरोपी सोन्याची चैन घेऊन फरार झाला होता. म त्र पोलिसांच्या कसून तपासामुळे अखेर त्याला अटक करण्यात आली. न्यायालयाने आरोपीला २८ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी अजय कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हर्षल एकरे करीत आहेत.

## हिंद दी चादर शहीदी समागम कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा : प्रधान सचिव श्रीकर परदेशी

### सर्व जिल्हाधिकाऱ्यांचा घेतला आढावा


दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा कार्यक्रम होत आहे. जागतिक स्तरावरील हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. सर्व भाविकांची व्यवस्था चोख होईल याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष द्यावे अशा सूचना मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या तयारीचा मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स) (दि.२१) सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, शहीदी समागम राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, समितीचे शासकीय समन्वयक डॉ.जगदीश सकवान, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. श्री. परदेशी यांनी छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी कार्यक्रमाच्या तयारीबाबत विचारणा केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योग्य नियोजन करावे, अशा सूचना केल्या.

जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी सांगितले की, मोदी मैदानावरील कार्यक्रम ठिकाणच्या परिसरात ५२ एकर मैदानावर भाविकांसाठी आवश्यक त्या सुविधा उभारण्यात येत आहेत. प्रशासनाने यासाठी सूक्ष्म नियोजन केले असून तयारी अंतिम टप्प्यात आहे. भाविकांच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था, मैदानालगत दोन टेन्ट सिटी, त्यामध्ये सुमारे १४ हजार भाविकांची निवास क्षमता, हॉटेल्स, शहरातील मंगल कार्यालये व शाळांमध्येही निवास व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व सुविधांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचेही ते म्हणाले.

गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग यांनीही कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत माहिती दिली. श्री. नाईक यांनी हा कार्यक्रम नऊ समाजातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन, समाज मिळून प्रयत्न करत आहे. या कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा या दृष्टीने जनजागृती व्हावी. यासह शालेय स्तरापासून महाविद्यालयापर्यंत आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धा यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या अधिकाधिक असावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## शब्दकोडे क्र. 69



आडवे शब्द

१. राष्ट्रभाषेत शपथ ४. विक्रमवीर सचिनचे आडनाव ८. शिव! शिव! १२. मर्यादा १३. रम्य, सुंदर स्थान १४. राज्यकारभाराचे प्रमुख शहर १६. आंध्रच्या किनाऱ्यालगतचे बंदर १८. उष्ण १९. मला २१. वेळ हिंदीत २३. उघडणे २५. गावातील टवाळ २६. दात २७. कबूतर ३०. वडिलांचा भाऊ ३१. रागाचे मोजमाप! ३२. ओलसर हवा ३४. वाळवी ३७. कायद्याप्रमाणे ३८. पैंजण ३९. ज्ञानेश्वर रचित प्रार्थना ४१. नाजूक ४३. गाडीचे पाय ४४. लागू पडल्यास नेमके औषध वा शब्द ४५. जाड दोर ४६. भूमीचे मार्दव सांगणारी कोंभाची हालचाल ४७. खोलवर नसलेले, वरपांगी ५०. एक अप्सरा ५१. आपमतलबी मंडळी हा देऊन कोहळा काढतात ५२. वसवलेली वस्ती ५५. उदा.हिरा, पाचू इ. प्रकार ५६. वजन, बोजा ५७. सूर्याचे एक नाव ५८. उगीच ६०. नगर, गाव ६२. पवित्र ६३. कौसल्यापुत्र ६५. मार्गस्थ ६६. घरातील मोठी माणसे ६८. पूर्वसूचना न देता ७१. 'कशाला उगाच' असा त्रास ७४. तापापूर्वी येणारे शहारे ७७. युवक ७८. या अभिनेत्रीने 'श्यामची आई' अजरामर केली ७९. जादा कामाचा दिवस!

उभे शब्द

१. खबदाड २. सरळ लांब वासा ३. छेड काढणारा ५. बसल्याजागी लागलेली निद्रा ६. पांढुरका रंग ७. दारूचा एक प्रकार ८. दुर्लक्ष, हेळसांड ९. निच, विश्वासघातकी १०. मातीचा कण ११. मालक १५. पळणे १६. अंजन १७. आडमुठा, हट्टी १९. चौथा हिस्सा २०. वाटाण्याच्या ओल्या शेंगा २१. शासनसंस्था, मंत्रीमंडळ २२. माज २४. भांडणात मध्यस्थी करणारा २५. गवई २७. तेच ते पुन्हा पुन्हा २८. उणीव, कसर २९. चिंतन ३०. मार्जारहत्या घडल्यास ही यात्रा करावी असा शास्त्रार्थ आहे ३१. बाळाचा मुका ३३. मऊशार हरळीसारखे कापड ३५. मिळमिळीत ३६. पृथ्वी ३७. शंकराचे एक नाव ४०. व्यवस्थापन ४१. कोमल, नाजूक, अपक्व ४२. चटकन ४३. एक पालेभाजी ४६. सीतेची जुळी मुले ४७. वाहन नेणे ४८. रममाण, निमग्न ४९. मांडणी ५३. मुलांचा एक बैठा खेळ ५४. घटस्फोट ५६. हमाल ५८. उलट, विरुद्ध ५९. फणसाचा एक प्रकार ६१. शंकर, प्रत्येक ६३. पौर्णिमा ६४. गळ्याभोवतीचे उबदार वस्त्र ६६. पहिला ऋतू ६७. रामबंधु ६९. कोवळी फांदी ७०. डुक्कर ७२. राबता, सवय ७३. दुबळा, गरीब ७५. पावसाची झड ७६. पडसे

### शब्दकोडे क्र. 68 चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर

१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.म नकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रम ताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.म सलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# डोणगावात भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव; गाईवर हल्ला करून ठार, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव पुन्हा एकदा वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मागील काही दिवसांपासून भटके कुत्रे गावात खुलेआम वावरत असून त्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः राज्य महामार्गालगत असलेली शाळा, महाविद्यालये तसेच दैनंदिन बाजारपेठेच्या परिसरात कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर दिसून येत आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाने काही दिवसांपूर्वी भटके कुत्रे पकडण्याची मोहीम हाती घेतली होती. ही मोहीम दोन ते तीन दिवस सुरू राहिल्याने काही काळ कुत्र्यांचा वावर कमी झाला होता. मात्र, मागील दोन दिवसांपासून हेच कुत्रे पुन्हा गावात मोठ्या संख्येने दिसू लागल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे.

काल रात्री बाजड यांच्या गाईवर हल्ला करून कुत्र्यांनी तिला अक्षरशः फाडल्याची धक्कादायक घटना घडली. कुत्र्यांनी गाईचे लचके तोडल्याने ती जागीच मृत्युमुखी पडली. या घटनेमुळे भटक्या कुत्र्यांची दहशत किती वाढली आहे, याचे गंभीर चित्र समोर आले आहे. आता कुत्रे केवळ माणसांनाच नव्हे तर जनावरांनाही लक्ष्य करू लागल्याने परिस्थिती अधिकच भयावह बनली आहे.

गावातील लहान मुले, महिला तसेच ज्येष्ठ नागरिक कुत्र्यांच्या हल्ल्याच्या भीतीने घराबाहेर पडण्यास घाबरत आहेत. शाळकरी मुले, सकाळी फिरायला जाणारे नागरिक आणि बाजारात ये-जा करणारे व्यापारी यांच्यातही भीतीचे वातावरण आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्याआधी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

भटक्या कुत्र्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनाने प्रभावी मोहीम राबवावी, कुत्र्यांचे निर्जंतुकीकरण तसेच योग्य ठिकाणी त्यांची विल्हेवाट लावावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वेळेत ठोस कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.



## लाभ थांबलेल्या 'लाडक्या बहिणींची' पुन्हा पडताळणी

### अंगणवाडी सेविकांमार्फत प्रक्रिया,दोन महिन्यांपासून बंद असलेला योजनेचा लाभ लवकरच सुरू होणार

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेचा लाभ थांबलेल्या महिलांसाठी दिलासादायक आणि महत्त्वाची बातमी आहे. गेल्या दोन महिन्यांपासून बंद असलेला योजनेचा लाभ लवकरच पुन्हा सुरू होणार असून, यासाठी लाभार्थी महिलांची पुन्हा एकदा पडताळणी करण्यात येणार आहे, अशी माहिती महिला व बालकल्याण विभागाने दिली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही राज्यातील २२ लाखांहून अधिक महिलांचा लाभ थांबलेला होता. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील सुमारे ३० हजार महिलांचा समावेश आहे. लाभ अचानक बंद झाल्यामुळे अनेक महिलांमध्ये संभ्रम व चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.



या पार्श्वभूमीवर महिला व बालकल्याण विभागाने लाभ बंद असलेल्या महिलांची अंगणवाडी सेविकांमार्फत पुन्हा पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रक्रियेद्वारे पात्र महिलांची माहिती अद्ययावत करण्यात येऊन त्यांचा योजनेतील लाभ पुन्हा सुरू केला जाणार आहे. जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी अमोल दिघुळे यांनी सांगितले की, पडताळणी पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थी महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ नियमितपणे मिळेल. त्यामुळे संबंधित महिलांनी अंगणवाडी सेविकांना आवश्यक माहिती व सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.


या निर्णयामुळे लाभ थांबलेल्या हजारो 'लाडक्या बहिणींना' मोठा दिलासा मिळणार असून, योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.


## अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांचा जिल्हा दौरा; २७ व २८ जानेवारीला घेणार विविध विभागांचा आढावा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम हे दि. २७ व २८ जानेवारी २०२६ रोजी बुलढाणा जिल्ह्यात दोन दिवसीय जिल्हा दौऱ्यावर येत आहे. दौऱ्यादरम्यान ॲड. धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांचा आढावा घेणार आहे.

त्यांच्या दौऱ्यानुसार मंगळवार दि. २७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बुलढाणा शासकीय विश्रामगृह येथे आगमन व आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली बुलढाणा नगरपरिषदेच्या सभागृह हॉलमध्ये बुलढाणा, मलकापूर, शेगाव, खामगाव व चिखली नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांचेसोबत जिल्हा परिषदकडे प्राप्त होणाऱ्या महसूलाचे एकूण ५ टक्के निधी आस्थापना, वजा खर्च, आर्थिक दुर्बल घटकावर केलेल्या खर्चाची मागील ५ वर्षाचा आढावा व कामाची तपासणी तसेच नागरी दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, लाड पागे योजनेतील प्रलंबित प्रकरणे, अनुकंपा तत्त्वावरील प्रकरणे तसेच अनुसूचित जातींसाठी प्राप्त होणाऱ्या निधीबाबत तपासणी. दुपारी २ वाजता राखीव व दुपारी २.३० वाजता शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथे पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या अंतर्गत लाड पागे समितीच्या नियुक्ती संदर्भातील सर्व प्रलंबित प्रकरणांबाबत आढावा. त्यानंतर दुपारी ३.३० वाजता जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हिल सर्जन), बुलढाणा यांच्यासोबत लाड पागे समितीच्या प्रलंबित प्रकरणांबाबत बैठक. दुपारी ४ वाजता जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यासोबत तर सायंकाळी ५ वाजता जिल्हा परिषदचे महिला व बाल विकास अधिकारी यांच्यासोबत आढावा बैठक, रात्री शासकीय विश्रामगृह येथे मुक्काम करतील. बुधवार, दि. २८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता बुलढाणा नगरपरिषद सभागृह हॉल येथे मेहकर, नांदुरा, लोणार, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, जळगाव जामोद, मोताळा व संग्रामपूर नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत संबंधित नगरपरिषदांच्या ५ टक्के निधीचा वापर, आर्थिक दुर्बल घटकांवरील खर्च, नागरी दलित वस्ती, रमाई आवास योजना, लाड पागे योजनेतील प्रलंबित प्रकरणे, अनुकंपा तत्त्वावरील प्रकरणे तसेच अनुसूचित जातींसाठी प्राप्त निधीबाबत सविस्तर आढावा व तपासणी, दुपारी २ वाजता राखीव, त्यानंतर सोयीनुसार मुंबईकडे रवाना होतील.

# बदलत्या हवामानाचा फटका; आंबा पीक धोक्यात, उत्पादन घटण्याची शक्यता





**बुलढाणा/प्रतिनिधी :** बदलत्या वातावरणाचा परिणाम आता जिल्ह्यातील आंबा पिकांवर स्पष्टपणे दिसून येत असून, आंबा उत्पादक शेतकरी चिंतेत सापडले आहेत. सध्या आंबा पिकांना मोहोर येण्याचा कालावधी सुरू असून, याच काळात भुरी रोग व कोळी किडीचा प्रादुर्भाव वाढल्याने मोहर गळून पडत असल्याचे चित्र अनेक आंबा बागांमध्ये दिसून येत आहे.

हवामानातील सतत होणारे बदल, तापमानातील चढ-उतार तसेच आर्द्रतेत झालेली वाढ यामुळे भुरी रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यासोबतच कोळी किडीनेही आंबा पिकांवर आक्रमण केल्याने मोहर आणि कोवळ्या फळांवर विपरीत परिणाम होत आहे. परिणामी आंब्याच्या उत्पादनात यंदा घट येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जिल्ह्यातील अनेक आंबा बागांमध्ये भुरी रोग व कोळी किडीचा प्रत्यक्ष प्रादुर्भाव आढळून आला असून, पुढील काही दिवसांत हवामानात बदल झाल्यास हा धोका आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. मोहर गळती वाढल्यास फळधारणा कमी होऊन शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. या पार्श्वभूमीवर कृषी तज्ज्ञांनी आंबा उत्पादक शेतकऱ्यांना वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचा सल्ला दिला आहे. रोग व किडींच्या नियंत्रणासाठी योग्य फवारणी, बागांची स्वच्छता, हवेशीर वातावरण राखणे आणि कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार उपाययोजना राबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आंबा पिक वाचवण्यासाठी तातडीने मार्गदर्शन व जनजागृती करण्याची गरज असल्याचेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

## सायकलपटूंच्या आरोग्य व सुरक्षिततेच्यादृष्टीने युसीआयच्या मानकांनुसार सुसज्ज वैद्यकीय सुविधा

**पुणे/प्रतिनिधी :** बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धे दरम्यान कोणतीही आकस्मिक परिस्थिती हाताळण्याकरिता युसीआयच्या मानकांचे पालन करुन सायकलपटूंच्या आरोग्य व सुरक्षिततेच्यादृष्टीने त्वरित वैद्यकीय मदतीकरिता अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.


प्रत्येक ८ किमीवर एक वैद्यकीय पथक त्यामध्ये रुग्णवाहिका, प्रथमोपचार संच, आपत्कालीन वैद्यकीय तंत्रज्ञ (ईएमटी), प्रत्येक २५-३० किमीवर एक प्रगत जीवनरक्षक सेवा (एएलस) अतिदक्षता विभाग (आयसीयु) मोबाईल युनिट (डॉक्टर आणि सुसज्ज उपकरणासहित विभाग) तैनात आहेत. प्रत्येक मार्गाच्या सुरुवात आणि शेवटच्या ठिकाणी मेडीकल बेस कॅम्प उभारण्यात आले आहेत. डोंगराळ व घनदाट क्षेत्रात प्रत्येक ५ किमीवर वैद्यकीय पथक उपलब्ध करण्यासोबत प्रत्येक मार्गावर २०-२५ कि.मी. त्रिज्येतील शासकीय व खाजगी रुग्णालयामध्ये समन्वय साधत कार्यवाही करण्यात येत आहे.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा; जिल्हा ग्रंथालय कार्यालयात ग्रंथप्रदर्शन व काव्यवाचन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी शासनाच्या धोरणानुसार दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. या पंधरवड्यानिमित्त जिल्हा ग्रंथालय कार्यालयात ग्रंथप्रदर्शन व काव्यवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.





ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी व साहित्यिक सर्जेराव चव्हाण तसेच कवयित्री वैशाली तायडे यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी साहित्याचे वाचन वाढवूनच मराठी भाषा पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचवता येईल, असे मत सर्जेराव चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केले. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी प्रमाणभाषेसह मराठी बोलीभाषांचा दैनंदिन जीवनात वापर करणे आवश्यक असल्याचे मत कवयित्री वैशाली तायडे यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी आशयघन व दर्जेदार मराठी कवितांचे सादरीकरण करून रसिकांची दाद मिळविली.

या कार्यक्रमास वाचक, स्पर्धा परीक्षा विद्यार्थी तसेच मराठी भाषेवर प्रेम करणारे ग्रंथप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय मऱ्हे यांनी तर आभार प्रदर्शन अजय सिरसाट यांनी केले. ग्रंथप्रदर्शनी दि. २८ जानेवारी २०२६ पर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार तसेच वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी ग्रंथालयाचे सभासद व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## वृत्तविशेष...

### प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत जिल्ह्यात हप्ते वितरण सुरळीत, निधीची कमतरता नाही

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रशासन स्तरावरून देशामध्ये निधी वितरणाच्या प्रणालीमध्ये सुधारणा करून नवीन एसएनए-स्पर्श प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदानाचे हप्ते वितरीत करण्याची कार्यवाही पंचायत समिती स्तरावरून सुरू करण्यात आली असून ती सुरळीतपणे सुरू आहे. बुलढाणा जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २.० अंतर्गत सन २०२४-२५ व २०२५-२६ या कालावधीसाठी १ लाख ३ हजार ४५६ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी आतापर्यंत ९० हजार ११४ लाभार्थ्यांना पहिला हप्ता, ३३ हजार २०२ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, तर १९ हजार ३९८ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता पंचायत समिती स्तरावरून वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित लाभार्थ्यांना देखील टप्प्याटप्प्याने हप्ते वितरणाची कार्यवाही सुरू आहे.

घरकुलांसाठी निधी उपलब्ध

सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २.० अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यासाठी एसएनए-स्पर्श प्रणालीवर १९६.४३ कोटी रुपये निधी उपलब्ध असून, त्यापैकी ५६.९९ कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला आहे. आतापर्यंत जिल्ह्यासाठी १३६.४४ कोटी रुपये निधी शिल्लक आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यात घरकुल बांधकामासाठी अनुदान वितरीत करण्यास निधीची कोणतीही कमतरता नसून, लाभार्थ्यांनी बांधकामाच्या प्रगतीनुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून हप्त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

### मुंबईत हक्काचे दुकान मिळवण्याची संधी कायम! म्हाडा गाळ्यांच्या लिलावास मुदतवाढत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई म्हाडा अंतर्गत येणाऱ्या मुंबई मंडळामार्फत मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांच्या परिसरात असलेल्या ८४ अनिवासी गाळ्यांच्या विक्रीसाठी आयोजित करण्यात आलेल्या ई-लिलाव प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबतची अधिकृत माहिती म्हाडाकडून जाहीर करण्यात आली आहे.या ई-लिलावासाठी इच्छुक अर्जदारांना ऑनलाइन नोंदणी आणि अर्ज भरण्यासाठी आता दि २ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे. यापूर्वी ही मुदत संपणार होती मात्र नागरिकांचा वाढता प्रतिसाद आणि अर्जदारांची मागणी लक्षात घेऊन ही मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नोंदणी आणि अर्ज प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र ठरलेल्या अर्जदारांसाठी दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाइन ई-लिलाव आयोजित करण्यात येणार आहे. हा लिलाव पूर्णपणे ऑनलाईन पार पडणार असून इच्छुकांनी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावरून सहभाग नोंदवायचा आहे.

हा ई-लिलार्व अधिकृत संकेतस्थळावर होणार आहे. मुंबईतील विविध ठिकाणी असलेल्या या गाळ्यांमध्ये दुकाने, कार्यालये तसेच इतर व्यावसायिक वापरासाठी उपयुक्त जागांचा समावेश आहे. त्यामुळे व्यापारी, उद्योजक आणि गुंतवणूकदारांकडून या ई-लिलावाला मोठा प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे.

अधिक माहितीसाठी आणि अर्ज प्रक्रियेसाठी इच्छुकांनी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन मंडळाकडून करण्यात आले आहे.

### 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमानिमित्त नांदेड शहरातील आठवडी बाजार २५ जानेवारी रोजी बंद

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** ''हिंद-दी-चादर'' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहीदी समागम राज्यस्तरीय समिती यांच्या मार्गदर्शनाखाली शीख, सिखलकरी, बंजारा-लमान, मोहियाल, सिंधी तसेच इतर सर्व समाजांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील मोदी मैदान, आसरजन येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमास देशातील पंजाब तसेच इतर राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे नांदेड शहरातील मोदी मैदान, रेस्ट हाऊस परिसर, सचखंड गुरुद्वारा, गुरु गोविंद सिंगजी विमानतळ, बसस्थानक, जुना मोंढा परिसर आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी मार्केट अॅण्ड फेअर अॅक्ट, १८६२ मधील कलम ५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सदर आठवडी बाजार सोमवार, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी भरविण्यात यावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.